IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# भटक्या विमुक्त समाजाच्या सक्षमिकरणात वाखरी आश्रमशाळेचे योगदान

**प्रा.डॉ.भारती कुमार सुडके**
सहाय्यक प्राध्यापक {इतिहास विभाग }
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर.

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*आश्रमशाळा*

**ABSTRACT**

"चालला चालला लामाणांचा तांडा या गावाहून दुजा गावा" या ओवी प्रमाणे महाराष्ट्राच्या खेडोपाडी रानावनात भटक्या विमुक्त जाती जमातीचे लोक पोटासाठी भटकत असल्याचे दिसते. त्यांचे संपूर्ण आयुष्य पोटाची खळगी भरण्यासाठी भटकंती करण्यातच संपून जाते. भटक्या विमुक्त जातीजमातीतील लहान मुले ही आपल्या कुटुंबाबरोबर या गावाहून त्या गावाला भटकत असतात. या लोकांच्या झोपडीच्या आसपासही शिक्षणाच्या सूर्याची किरणे पोहोचलेली नसतात. पारंपारिक व्यवसाय, अवगत कला, रुढी, परंपरा, देवदेवतावरील श्रध्दा, अंधश्रध्दा, दैववादीपणा, गावोगाव, रानोमाळ भटकंती हेच आपले जीवन मानणाऱ्या भटक्या विमुक्त समाजातील लोक स्वतःच्या सर्वांगीण विकासापासून कोसोमैल दूर राहिली. देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळात सरकारकडून शिक्षणाच्या सार्वत्रीकरणावर भर देण्यात आला. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या समाज घटकांना विकासाच्या प्रवाहात समावून घेण्यासाठी विविध शैक्षणिक आयोग नेमून सुधारणात्मक शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली याचे फलीत म्हणजे आदिवासी अनुसुचित जातीजमाती व भटक्या विमुक्त जातीजमातीतील मुलांच्या शिक्षणासाठी आश्रमशाळांची निर्मिती करून सरकारकडून निवासी मोफत शिक्षणाची सोय करण्यात आली. पंढरपूर शहरपासून नजिकच साधुसंत व वारकऱ्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या वाखरी या गावात समाजातील अनुसुचित व भटक्या विमुक्त जाती जमातीतील मुलामुलींना शिक्षण देणारी लक्ष्मणदास महाराज आश्रमशाळा आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Sudke, B. K. (2025). *भटक्या विमुक्त समाजाच्या सक्षमिकरणात वाखरी आश्रमशाळेचे योगदान.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **628–633**.

**प्रस्तावना :**

"चालला चालला लामाणांचा तांडा या गावाहून दुजा गावा" या ओवी प्रमाणे महाराष्ट्राच्या खेडोपाडी रानावनात भटक्या विमुक्त जाती जमातीचे लोक पोटासाठी भटकत असल्याचे दिसते. त्यांचे संपूर्ण आयुष्य पोटाची खळगी भरण्यासाठी भटकंती करण्यातच संपून जाते. भटक्या विमुक्त जातीजमातीतील लहान मुले ही आपल्या कुटुंबाबरोबर या गावाहून त्या गावाला भटकत असतात. या लोकांच्या झोपडीच्या आसपासही शिक्षणाच्या सूर्याची किरणे पोहोचलेली नसतात. पारंपारिक व्यवसाय, अवगत कला, रुढी, परंपरा, देवदेवतावरील श्रध्दा, अंधश्रध्दा, दैववादीपणा, गावोगाव, रानोमाळ भटकंती हेच आपले जीवन मानणाऱ्या भटक्या विमुक्त समाजातील लोक स्वतःच्या सर्वांगीण विकासापासून कोसोमैल दूर राहिली. देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळात सरकारकडून शिक्षणाच्या सार्वत्रीकरणावर भर देण्यात आला. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या समाज घटकांना विकासाच्या प्रवाहात समावून घेण्यासाठी विविध शैक्षणिक आयोग नेमून सुधारणात्मक शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली याचे फलीत म्हणजे आदिवासी अनुसुचित जातीजमाती व भटक्या विमुक्त जातीजमातीतील मुलांच्या शिक्षणासाठी आश्रमशाळांची निर्मिती करून सरकारकडून निवासी मोफत शिक्षणाची सोय करण्यात आली. पंढरपूर शहरपासून नजिकच साधुसंत व वारकऱ्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या वाखरी या गावात समाजातील अनुसुचित व भटक्या विमुक्त जाती जमातीतील मुलामुलींना शिक्षण देणारी लक्ष्मणदास महाराज आश्रमशाळा आहे.

**संशोधनाचा हेतु:**

१) आश्रमशाळा ही संकल्पना अभ्यासणे.

२) भटक्या विमुक्त समाजातील मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यास येणाऱ्या समस्या अभ्यासणे.

३) वंचित समाज्याच्या सक्षमिकरणात आश्रमशाळेची भूमिका अभ्यासणे

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधसाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधसाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. आश्रमशाळेला प्रत्यक्ष भेट देऊन विद्यमान प्राचार्य श्री क्षीरसागर मोहन कृष्णा माजी मुख्याध्यापक श्री भाऊसाहेब लक्ष्मण जगताप व शिक्षिका सौ जोशी स्वाती संतोष वसतिगृह पर्यवेक्षक यांची मुलाखत घेऊन माहिती संकलित केली. तसेच आश्रमशाळेचे वार्षिक अहवाल ही संशोधनासाठी ऊपयुक्त ठरले. संकलित माहितीचे विश्लेषण करून संशोधन पेपर तयार करण्यात आला आहे.

**आश्रमशाळेची स्थापना ;**

भटक्या विमुक्त जमाती साठी आश्रम शाळांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. या शाळा या वंचित समुदायातील मुला-मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदत करतात.वाखरी येथील आश्रमशाळेची स्थापन करण्या पाठीमागे. के. एस.क्षिरसागर व आण्णासाहेब सोनवणे यांचे कार्य महत्वपूर्ण आहे. के. एस. क्षिरसागर हे प्राथमिक शिक्षक होते. त्यांना बहुजन समाजातील मुले शिक्षणाच्या प्रवाहात आणून सज्ञान करण्याचा ध्यास होता. या ध्यासपूर्तीसाठी त्यांनी मानवतावादी विचारसरणीवर आधारित जातीयवादाशी नात न सांगणाऱ्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला.ज्यांच्या हृदयात सामाजिक जाणीवेच अधिष्ठान असते अशी माणसे मानवतावादी कार्य करण्यास अग्रेसर असतात. याप्रमाणे के. एस. क्षिरसागर सरांनी ज्यांच्या घरात अठरा विश्व दारिद्र्य, ज्यांचा संसार म्हणजे विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर अशा भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी ज्ञानदान करण्याच्या हेतूने आपले मित्र आण्णासाहेब सोनवणे व सुभाष सोनवणे यांच्या सहकार्याने जवाहरलाल शिक्षण प्रसारक विश्वस्थ मंडळाची स्थापना केली.या मंडळाच्या सहाय्याने व तत्कालीन कृषीमंत्री जेष्ठ विधानसभा सदस्य आमदार भाई गणपतराव देशमुख यांच्या प्रयत्नाने वाखरीच्या पालखी तळावर ९ जून १९८० रोजी लक्ष्मणदास महाराज आश्रमशाळा सुरू केली.

**आश्रमशाळेची उद्दिष्ट्ये :**

'शिक्षण आणि सेवा' हे या आश्रमशाळेचे ब्रिद वाक्य आहे. समाजातील तळागळातील अनुसूचित जाती जमातीतील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, मुलांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे, शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडवून आणणे, मुलामुलींच्या अंगभूत गुणांना वाव देणे, त्यांना समाजात सन्मानाने जगण्यासाठी तयार करणे, आदिवासी व भटक्या जाती जमातीच्या उन्नतीवर भर देवून त्यांचा आर्थिक विकास घडवून आणणे.शिक्षण आणि प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि आंतरिक शक्ती विकसित करणे. विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनण्यास मदत करणे ही आश्रमशाळेची उद्दिष्ट्ये आहेत.

**वंचित समाजाच्या मूला-मुलींना आश्रमशाळेत आणण्यासाठी विशेष प्रयत्न**:

भटक्या-विमुक्त समजातील लोक साधन विहीन समाज दिशाहीन होवून पोटासाठी भटकत राहिला. नंदीवाले, जोशी, माकडवाले (मदारी), अस्वलवाले (दरवेशी) इत्यादी प्राण्याचा वापर करून समाजाचे मनोरंजन करणे, देतील तेवढेच घेणे. कैकाडी, तांबटकरी , घिसाडी, सनगर, वैदू इत्यादी समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक गावात दोन-तीन दिवस मुक्काम ठोकायचे काम संपली की दुसऱ्या गावाला सकाळी लवकर उठून ऊनं पडायच्या अगोदर आपला मुक्कम हलवायचा असं नेहमीचच त्यांच चाललेल. आज इथे तर उद्या तिथे या प्रमाणे आपले जीवन व्यतीत करणाऱ्या भटक्या विमुक्त जाती जमातीतील मुला-मुलींना ४५ वर्षापूर्वीच्या काळात शिक्षणासाठी प्रवृत्त करणे ही गोष्ट अतिशय अवघड होती. क्षिरसागर दादा, सोनवणे आबा, आण्णासाहेब सोनवणे, यांनी सुरुवातीला खेडोपाडी जावून विद्यार्थ्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. जातीभेद व मानपानाच्या पलीकडे जावून समाजातील अनुसूचित व उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न दिवसरात्र चालू केला.वंचित समाजाच्या मूला-मुलींना आश्रमशाळेत आणण्यासाठी अविरत प्रयत्न केले. आश्रमशाळेत आसपासच्या खेड्यापाड्यातील, जिल्ह्यातील कैकाडी, कोल्हाटी, गोंधळी, नंदीवाले, व-हाडी, बहुरूपी, वैदू व्हटकर, डोंबारी, सनगर, मदारी, दरवेशी अशा भटक्या विमुक्त जाती जमातीतील मुले-मुली आश्रमशाळेत येवू लागली. सुरूवातीला ३० विद्यार्थ्यांवर इ. १ लीचा वर्ग सुरू झाला. थोड्याच कालावधीत विद्यार्थ्यांची संख्या १००० च्या वर गेली. आश्रमशाळा सुरुवातीला वाखरी गावात मुजावर यांच्या वाड्यात सुरू झाली. त्यानंतर सन १९८४ ते १९८६ या काळात कर्मवीर भाऊराव पाटील पंढरपूर कॉलेजचे प्राचार्य नारायण भगरे यांच्या मळ्यात भरत होती. नंतर जून १९८६ मध्ये संस्थेचे अध्यक्ष आण्णासाहेब सोनवणे यांनी पालखी तळावरील स्वतःची एक एकर जमीन नाममात्र किंमतीस दिली. तेथे आश्रमशाळेची इमारत उभी आहे. सन १९८९ मध्ये शासनाचे अनुदान आश्रमशाळेला सुरू झाले. आश्रमशाळेचे माजी मुख्याध्यापक भाऊसाहेब जगताप यांच्या शिस्तबध्द व काटेकोर प्रशासनामुळे आश्रमशाळा लौकिकास प्राप्त ठरली.

**नि:शुल्क निवासी आणि शैक्षणिक सुविधा:**

गरिबीमुळे, अनेक कुटुंबे आपल्या मुलांना नियमित शाळेत पाठवू शकत नाहीत. आश्रम शाळांमध्ये नि:शुल्क राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था असते. मोफत वसतिगृह यामुळे पालकांवरील आर्थिक बोजा कमी होतो. आश्रमशाळेत वसतीगृह आहे. इ. १ ते १२ च्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहात राहण्याची सोय आहे.एकूण ३०० विद्यार्थी राहू शकतील असे मोठे वसतीगृह आहे. मुला-मुलींचे स्वतंत्र वसतीगृह आहे. वसतिगृहातील मुलांना पोषक आहार दिला जातो. पालक एकदा मुलांना वसतीगृहात सोडून गेले की ते वसतीगृह व आश्रमशाळा हीच त्या मुलांचे आई बाप असते.विद्यार्थ्यांना शिक्षण साहित्य, गणवेश, जेवणाची भांडी, अंथरुण-पांघरूण, साबण आणि तेल यांसारख्या आवश्यक वस्तू पुरवल्या जातात. वसतीगृहात नि:शुल्क निवासी व पोषक आहारामुळे महाराष्ट्रातील अनेक विध्यार्थी या आश्रमशाळेत शिक्षण घेत आहेत.

**विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी येथील मुख्याध्यापक व शिक्षकांचे विशेष योगदान**

आश्रम शाळा मुलांना त्यांच्या अस्थिर, भटक्या किंवा प्रतिकूल कौटुंबिक वातावरणातून काढून संरचित, सहायक शिक्षण वातावरणात घेऊन येतात. भटक्या विमुक्त समाजातील मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यास येणाऱ्या समस्यांना आश्रमशाळेतील शिक्षकांना सामोरे जावे लागते. शिक्षणाचा कसलाही गंध नसणाऱ्या अशा मुलांना घडविताना येथील शिक्षकांना तारेवरची कसरत करावी लागते. आश्रमशाळेत आलेल्या काही विद्यार्थ्यांना ४ थी, ५ वी पर्यंत शिक्षण झाले की, त्यांचे आईवडील मुलांना शाळेत पाठवत नसत. वसतिगृहातील मुले-मुली सुट्टीला घरी गेले की परत शाळेत येतील याची शाश्वती नसते. अशावेळी परत एकदा या मुलांच्या घरी जावून त्यांच्या पालकांना समजावून ती मूले शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य येथील मुख्याध्यापक व शिक्षकांना करावे लागते. आश्रमशाळेतील शिक्षक मुलामुलींचे आई वडिला प्रमाणे काळजी घेतात.आश्रमशाळेत जातीच्या शृंखला तोडून कोणताही भेदभाव न करता शिक्षण दिले जाते. अतिशय प्रामाणिक व सेवाभावी वृत्तीने आश्रमशाळेतील विद्यार्थी सुसंस्कारीत आर्थिकदृष्ट्या सक्षम व समाजाच्या प्रवाहात आत्मविश्वासाने वावरतील असे धाडस निर्माण करण्याचे महान कार्य आश्रमशाळेत केले जात आहे.

**विद्यार्थी विकासासाठी आश्रमशाळेतील उपक्रम :**

आश्रम शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे आश्रमशाळेत मुला-मुलींना सहानुभूती पोटी शिक्षण दिले जात नाही तर त्यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव मिळावा व ते विविध क्षेत्रात यशस्वी व्हावेत यादृष्टीने शिक्षण दिले जाते. वसतीगृहातील मुला-मुलींच्या आरोग्याची विशेष काळजी घेतली जाते.शाळेतील मुला-मुलींच्या सुप्त गुणांना, कलाकौशल्याला वाव मिळावा या हेतूने प्रत्येक वर्षी शाळेत स्नेहसंमेलन आयोजित केले जाते. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने प्रसिध्द साहित्यिक, नाटककार, समाजसेवक, राजकीय व शैक्षणिक विचारवंतांना बोलावले जाते. यावेळी अनेक स्पर्धा आयोजित केल्या जातात. याशिवाय गायन वादन नृत्य कलेचा अविष्कार संमेलनाच्या निमित्ताने पहावयास मिळतो. या व्यतिरिक्त थोरामोठ्या व्यक्तींच्या जयंती, पुण्यतिथी, महिला मेळावा, दिनविशेष साजरे केले जातात. विद्यार्थ्यांची अंकगणितीय क्षमता व सृजनशीलता वाढवणे, शब्द सामर्थ्य व शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी पुण्यातील Intel key मार्फत उपक्रम शाळेत राबविले गेले.

उच्च शिक्षणाचे महत्व ओळखून आश्रमशाळेत ज्युनिअर कॉलेज (कला, विज्ञान) व व्यवसाय शिक्षण (क्रॉप सायन्स व मोटार रिवायडिंग) हे कोर्सेस चालू केले. ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगणककक्ष, जिमखाना, क्रिडांगण, इत्यादी सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शाळेचे माजी मुख्याध्यापक भाऊसाहेब जगताप यांनी आश्रमशाळेच्या कार्यासाठी संस्था प्रतिनिधींना विश्वासात घेवून त्यांच्या बरोबरीने शाळेची नेत्रदिपक प्रगती केली. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अनेक उपक्रम राबविले. तालुका व जिल्ह्यातील शिक्षकांना एकत्र करून जगताप सरांनी आश्रमशाळा शिक्षक कल्याण संघाच्या माध्यमातून आश्रमशाळेतील शिक्षकांसाठी शैक्षणिक मार्गदर्शन शिबीर, क्रिडा स्पर्धा, स्नेह मेळावे भरविले. आश्रमशाळेतील शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या समाजकल्याण खात्यात नसलेली आदर्श शिक्षक पुरस्काराची योजना सुरू केली. आश्रमशाळेचे विद्यमान अध्यक्ष डॉ मंदार सुभाष सोनवणे ,विद्यमान प्राचार्य श्री मोहन कुष्णा क्षिरसागर, शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग आश्रमशाळेतील विध्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आत्मियतेने कार्य करीत आहेत.

**आश्रमशाळेची यशस्वी वाटचाल :**

भटकंतीमध्ये जी मुले शिक्षणापासून वंचित राहिली अशा मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणाऱ्या या आश्रमशाळेची सुरूवात ३० मुले व १ वर्ग अशी झाली होती.अनेक खडतर प्रवासातून सध्या आश्रमशाळा स्वतःच्या जागेमध्ये ४० खोल्यांची तीन मजली आर.सी.सी. इमारतीमध्ये भरत आहे. सध्या ५ ते १० वी ५२४ विद्यार्थी ११ते१२ वी २०४ विध्यार्थी शिक्षण घेत आहेत. आश्रमशाळेत माध्यमिक, उच्चमाध्यमिक (कला विज्ञान), व्यवसाय शिक्षण (MCVC) वसतीगृह असे विभाग आहेत.शाळेत १४ माध्यामिक,०८ उच्च माध्यमिक

व ०३ MCVC शिक्षक आहेत.शाळेची प्रगती पाहून अनेक मान्यवरांनी शाळेला भेटी देवून शाळेचा गुणगौरव केला आहे. सन १९९३ मध्ये तत्कालीन राज्यपाल मा. डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांनी आश्रमशाळेला भेट दिली. "शासनाच्या ध्येय धोरणानुसार आदर्शवत चालणारी आश्रमशाळा" असे त्यांनी गौरवोद्‌गार काढले.समाजकल्याण सचिव शशिकांत दैठणकर, गीतकार जगदीश खेबूडकर, कांदबरीकार बाबा कदम, बाल साहित्यिक द. मा. मिरासदार, आ. तात्या डिंगरे, अपर्णा रामतिर्थंकर, सिंधुताई सप्ताळ, अशा मान्यवरांनी संस्थेला भेटी दिल्या. मार्गदर्शनपर व्याख्याने दिली. आश्रमशाळेवर कौतुकास्पद शब्द सुमनांचा वर्षाव केला. सन २०१३-१४ या वर्षी या आश्रमशाळेने रौप्य महोत्सव साजरा केला. यावेळी शाळेचे विद्यार्थी वारकरी दिंडी, मुलींचे झेंडा पथक, ऐतिहासिक वेषभुषेतील घोडेस्वार, माजी विद्यार्थी मेळावा, क्रिडा स्पर्धा असे अनेक कार्यक्रम आयोजित केले. यावेळी ही अनेक मान्यवर उपस्थित होते.

**हजारो विद्यार्थी शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम :**

शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुला-मुलींना आश्रमशाळेच्या माध्यमातून मोफत राहण्याची व शिक्षणाची उत्तम सोय झाली. यांच्या कलाकौशल्याला वाव मिळाला.यांना स्थिर व पोषक वातावरण मिळाले. त्यामुळे शिक्षण व आर्थिक विकासापासून कोसोमैल दूर असलेले घटक समाजाच्या मुख्य प्रवाहात आल्याचे दिसते. शैक्षणिक पात्रता व शासकीय नोक-यातील आरक्षणाच्या धोरणामुळे भटक्या विमुक्त जाती जमातीतील अनेक तरूण तरुणी शासकीय सेवांमध्ये आदर्शवत कार्य करीत असल्याचे दिसत आहे. या आश्रमशाळेतून गेल्या ४५ वर्षात हजारो विद्यार्थी शिक्षित झाले. शाळेला अभिमान वाटावा, शाळेच्या नावलौकिकतात भर टाकणारे विद्यार्थी आज राज्याच्या विविध भागात कार्यरत आहेत. कोण मंत्रालयात आहेत तर कोण जिल्हाधिकारी कार्यालयात, कोण पोलीस खात्यात तर काही संगणक अभियंता म्हणून परदेशात लाखो रूपयांची नोकरी करीत आहेत. तर काही तहसिलदार व शिक्षक म्हणून सन्मानाने कार्य करीत आहे असे दिसते. उदा: हेमा जाधवर नायब तहसिलदार,इंद्रजित गोरे उपसंचालक मंत्रालय(मुंबई ),डॉक्टर विजय साळुंखे (सातारा ,सुधाकर गायकवाड इंजिनियर (जर्मनी)

**सारांश :**

अज्ञानरूपी अंधारात खितपत पडलेल्या व पोटाची खळगी भरण्यासाठी सतत भटकंती करणाऱ्या कुटुंबातील मुलेमुली शेक्षणिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात निरिक्षर असतात पण लोकशिक्षणातून आलेले व्यवहार चातुर्य त्यांच्याकडे मोठे असते. अशा मुला-मुलींना आश्रमशाळेच्या माध्यमातून शिक्षणाची उत्तम सोय झाली. शिक्षणातून त्यांना डोळसपणा प्राप्त झाला असे दिसते. त्यांचे आत्मभान जागृत होवून समाजात सन्मानाने जगण्याची त्यांची धडपड सुरू झाली. येथील विद्यार्थी परंपरागत रूढी परंपरा भेदून विज्ञानवादी दृष्टीकोन आत्मसाद करीत आहेत.आजच्या जागतिकीकरण व प्रचंड महागाईच्या काळात समता, बंधुता या तत्वावर आधारित भटक्या जाती जमातीतील मुला-मुलींना मोफत राहण्याची, जेवणाची सोय करून त्यांची शैक्षणिक प्रगतीतून आर्थिक प्रगती व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या कार्यात या आश्रमशाळेचे कार्य गौरवास्पद आहे. सध्या पुणे विभागातील उत्तम आश्रमशाळा म्हणून या आश्रमशाळेचा लौकिक आहे. गेली ४५ वर्षे अतिशय प्रामाणिक व आत्मियतेने व सेवाभावी वृत्तीने वाखारी आश्रमशाळा भटक्या विमुक्त समाजातील विद्यार्थी सुसंस्कारीत ,शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यामध्ये आश्रमशाळेचे योगदान महत्वपूर्ण आहे.

**संदर्भ साधने :**

१) मुलाखत भाऊसाहेब जगताप , माजी मुख्याध्यापक, आश्रमशाळा वाखरी, पंढरपूर, बुधवार दि.०३ /१२ /२०२५, दु. १.३० वा.

२) मुलाखत ,विद्यमान प्राचार्य श्री मोहन कुष्णा क्षिरसागर,आश्रमशाळा वाखरी, पंढरपूर, शनिवार दि. ०६ /१२ २०२५, स, ११.३० वा.

३) मुलाखत , सौ जोशी स्वाती संतोष, शिक्षिका आश्रमशाळा वाखरी, पंढरपूर, शनिवार  दि. ०६ /१२ २०२५, स, १२.०० वा.
४ ) आश्रमशाळा वाखरी, पंढरपूरचा सन १९९८-९९ चा वार्षिक अहवाल.
५) स्मरणिका, आश्रमशाळा वाखरी, पंढरपूर, जवाहरलाल शिक्षण प्रसारक मंडळ, पंढरपूर संचलित,
६) रेकॉर्ड फाईल (माजी विद्यार्थी) आश्रमशाळा वाखरी (पंढरपूर)